# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १४ ◆ अंक ४७ ◆ अमरावती ◆ दि. २१ ते २७ मार्च २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## २४ तासांत अनधिकृत राजकीय जाहिराती हटवा : निवडणूक आयोग

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांना येत्या २४ तासांत सर्व अनधिकृत राजकीय जाहिराती हटवण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारी आणि खासगी ठिकाणांवरील अशा प्रकारच्या सर्व जाहिराती हटवत गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अनुपालन अहवाल दाखल करा, असे आयोगाने राज्यांना सांगितले आहे.आयोगाने यासंदर्भात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रधान कॅबिनेट सचिव व मुख्य सचिवांना पत्र पाठवले आहे.लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. यानंतरही जाहिराती काढण्यात आल्या नसल्याच्या तक्रारी मिळाल्याचे आयोगाने म्हटले आहे. काँग्रेसने हा मुद्दा उपस्थित केला होता.

# काँग्रेसमध्ये चंद्रपूर, गडचिरोलीचा वाद कायम

### दिल्लीतील बैठकीतही तोडगा नाही, येत्या दोन दिवसांत निर्णयाची शक्यता




नवी दिल्ली : महाराष्ट्रातील काँग्रेसच्या वाटय़ाला येणाऱ्या १० जागांवर बुधवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत चर्चा झाली. पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या विदर्भामधील ४ जागांचे उमेदवार जवळपास निश्चित झाले असले तरी गडचिरोली व चंद्रपूरचा वाद अद्याप कायम असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या एखाद-दोन दिवसांमध्ये तिसऱ्या यादी जाहीर होण्याची शक्यता असून यात या १० जागांचा समावेश असेल, असे सांगितले जात आहे.

राज्यातील महाविकास आघाडीची गुरुवारी मुंबईमध्ये बैठक होणार असून जागावाटपाचा तिढा यावेळी सोडवला जाईल. त्याआधी काँग्रेसच्या नेत्यांचा बैठक होईल. त्यात दिल्लीतील बैठकीत निश्चित न झालेल्या उमेदवारांवर चर्चा होऊ शकेल. गडचिरोलीमध्ये नामदेव किरसान व नामदेव उंडी यांच्या नावावर चर्चा झाल्याचे समजते. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघामध्ये विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या कन्या शिवानी वडेट्टीवार व काँग्रेसचे माजी खासदार दिवंगत बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर या दोन्ही इच्छुक महिला उमेदवार दिल्लीत दाखल झाल्या आहेत. धानोरकर पक्षाध्यक्ष खरगे यांच्या भेटीसाठी निवासस्थानीही गेल्या होत्या. शिवानी वडेट्टीवारही दिवसभर दिल्लीतील काँग्रेसच्या मुख्यालयात होत्या. याबाबत विचारले असता, चंद्रपूरमध्ये खूप उमेदवार इच्छुक असल्याचे पटोले यांनी सांगितले. धानोरकर यांचे पारडे जड असले शिवानी वडेट्टीवार यांनीही आपला दावा अद्याप कायम ठेवल्याची माहिती सूत्रांनी दिली. बुधवारच्या बैठकीत या दोन्ही जागांवर तोडगा निघू शकलेला नाही. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ छत्रपती शाहू महाराज यांच्यासाठी सोडण्यावर महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्षाची सहमती झाली आहे. काँग्रेसने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याचे समजते. २०१९ मध्ये ही जागा शिवसेने लढवली होती. मात्र शाहू महाराजांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केल्याने जागा सोडण्याची तयारी ठाकरे गटाने दाखवली असली, तरी त्याबदल्यात सांगलीची जागा मागितली आहे. मात्र काँग्रेसचे नेते विश्वजीत कदम यांचा याला विरोध आहे. सांगली संदर्भात निर्णय मुंबईत घेतला जाईल असे सांगण्यात आले आहे.

वंचित बहुजन आघाडी यंदाच्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीपासून वंचित राहण्याची शक्यता बळावली आहे. 'वंचित'चे नेते प्रकाश आंबेडकर यांनी खरगे यांना पत्र लिहिले होते. या मुद्द्यावरही बुधवारी प्रदेश काँग्रेस नेत्यांच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्याचे कळते. यासंदर्भात मुंबईतील महाविकास आघाडीच्या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे. 'वंचित'ने सात जागांची मागणी केली होती. मात्र, दोन जागा देण्याची तयारी महाविकास आघाडीने ठेवली होती. त्यानंतर 'वंचित'कडून चार जागांची मागणी केल्याचे सांगितले जाते.

राज्यात काँग्रेस १८ जागा लढवण्याची शक्यता असून सांगली, भिवंडी, मुंबईतील दक्षिण-मध्य या तीन जागांवरही पक्षाने दावा केला आहे. त्यासंदर्भात बुधवारी राज्यातील नेत्यांनी खरगे यांच्याशी चर्चा केली. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सतेज पाटील, वर्षा गायकवाड या नेत्यांनी खरगेंची भेट घेण्याआधी महासचिव मुकुल वासनिक

## खेड येथे महिलेची निघृण हत्या

### शेतात मृतदेह आढळला





मोर्शी (ता. प्र.) दि. २० : तालुक्यात खेड येथे एका ४० वर्षीय महिलेची निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना बुधवारी (ता. २०) निदर्शनात आली. रामकली जगरलाल उईके (वय ४० वर्ष) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयावरून रामकलीचा पती जगरलाल उईके व त्याचा ८ वर्षाचा मुलगा यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मध्यप्रदेश येथील हिरडी गावातील जगरलाल उईके हा कामाकरिता खेड येथे असलेल्या पडीत प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या दहा वर्षापासून पत्नी रामकली (वय ४०) व मुलगा (वय ८ वर्ष) राहत होता. रामकली ही सोमवारी (ता. १८) लोकांना बाजारात दिसली होती. त्याच दिवशी रात्री ७ वाजताचे सुमारास गिरणीवर दळण आणण्यासाठी जाते म्हणून गेली, तेव्हापासून ती घरी परतलीच नाही. पती जगरलाल हा तिच्या शोधात होता मात्र ती आढळून आली नाही. बुधवारी (ता. २०) गावातील महिला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागे असलेल्या एका शेतात पऱ्हाटी वेचण्यासाठी गेल्या. त्यांना ही महिला बोरीच्या झाडाखाली साडीचा पदर गळ्याला बांधलेल्या अवस्थेत व दुसरा पदर बोरीच्या झाडाला तात्पुरता लटकलेला दिसला. ती जमिनीवर मृत अवस्थेत पडलेली दिसली. महिलांनी ही माहिती गावकऱ्यांना दिली. घटनेबाबत मोर्शी पोलिसांना कळविण्यात आले. मोर्शीचे ठाणेदार श्रीराम लांबाडे यांनी चमूसह घटनास्थळ गाठून मृत रामकलीचे प्रेत उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे उत्तरिय तपासणीसाठी पाठविले.

## मालमत्ताकर दीडपट झाल्याची अफवा; प्रशासन गप्प

### काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा आरोप | महापालिका आयुक्तांच्या दालनात मोर्चा



अमरावती दि.२० : महानगर पालिकेकडून मालमत्ताकरात प्रचंड वाढ करून त्याची सक्तीने वसुली करण्यात येत असतांना, काँग्रेस पक्षातर्फे शहराध्यक्ष बबलु शेखावात यांच्या नेतृत्वात आज पुन्हा मनपा आयुक्तांची भेट घेवुन मालमत्ता कर चारपटी ऐवजी दिडपट भरण्याच्या संदर्भात आलेल्या बातम्यांचा खुलासा मागीतला. मालमत्ताकराची अव्वाच्या सव्वा वसुली करण्यात आल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा देखील यावेळी देण्यात आला. अमरावती शहरातील मालमत्ता कराबाबत गेल्या आठवड्यात अमरावती शहराच्या विद्यमान आमदार यांच्या वतीने सर्वच वर्तमानपत्रांमध्ये मालमत्ता कर आता चार पटीवरून दिड पटीवर, नागरिकांना मोठा दिलासा अश्या आशयाच्या मोठ्या मोठ्या मथळ्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. उपमुख्यमंत्री अजित पवार,आमदारांचे यजमान व मनपा आयुक्त यांचे सोबत झालेल्या बैठकीचा संदर्भ देत या बैठकीत हा निर्णय झाल्याची बातमी प्रकाशित करण्यात आली होती. यामुळे अमरावतीकर जनतेमध्ये मालमत्ता कराबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत चर्चा करण्याकरिता व वास्तविकता जाणून घेण्यासाठी काँग्रेस पक्षाचे शिस्तमंडळ शहराध्यक्ष बबलू शेखावत यांचे नेतृत्वात माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे,माजी महापौर अशोक डोंगरे,माजी व समिती सभापती बाळासाहेब भुयार माजी नगरसेवक व पदाधिकारी यांचे सह मनपा आयुक्त देविदास पवार यांचे कडे गेले होते. या वेळी चर्चे दरम्यान वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांबाबत आयुक्तांना विचारणा केली असता वृत्तपत्रांमध्ये प्रसारित झालेल्या या बातम्या बद्दल मला काही माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले. असे असताना या दिशाभूल करणाऱ्या बातमीचे खंडन आयुक्तांद्वारे किंवा महानगरपालिकेद्वारे अद्यापही करण्यात का करण्यात आले नाही याबाबत सुद्धा एक मुखाने विचारणा करण्यात आली. परंतु यावरही आयुक्तांनी मौन बाळगणे पसंत केले. आलेल्या बातम्यानुसार आता महानगरपालिकेने केलेले करनिर्धारण स्थगित करून प्रसारित झालेल्य बातमीच्या अनुषंगाने वर्ष २०२१-२२ च्या जुन्या असेसमेंट वर जास्तीत जास्त दीडपट कर नागरिकांनी भरावा असा निर्णय आयुक्तांनी जाहीर तरी करावा अशी आग्रही मागणी शिस्त मंडळ द्वारे करण्यात आली. यावर आयुक्तांनी असे करता येणे शक्य नसल्याचे सांगितले. असे असताना बातम्यांचे खंडणही करायचे नाही आणि नागरिकांना वाढीव मालमत्ता करात दिलासाही द्यायचा नाही यामुळे चर्चेदरम्यान खुलासा होऊन कोणत्याही प्रकारचा तोडगा निघाला नाही. काँग्रेस पक्षाद्वारे वाढीव मालमत्ता कराच्या विषयावर गेल्या वर्षभरापासून सातत्याने नागरिकांमध्ये जनजागृती करून मोठ्या प्रमाणात आंदोलने केली व कोणत्याही परिस्थितीत अति प्रचंड प्रमाणात वाढवलेला हा मालमत्ता कर नागरिकांनी भरू नये अशी खुली भूमिका घेतली होती.







काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## समस्येचा विळखा !

*जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाची सरकार दरबारी नोंद व्हावी आणि त्याच्या अस्तित्वाला अधिकृतता यावी हा प्रत्येक बालकाचा हक्क असतो. जन्माचा दाखला हा त्याचा पहिला हक्क प्राप्त झाला की, बालकाची जसजशी वाढ होत जाईल तसतसा त्याच्या अन्य हक्कांच्या जाणिवा अगोदर पालकांमध्ये, नंतर समाजामध्ये आणि त्याबरोबरच सरकारी यंत्रणांमध्येही जागृत असतील, तर बालकांचे शारीरिक आणि बौद्धिक पोषण योग्य रीतीने होते. ते तसे व्हावे यासाठी शिक्षणाचा हक्क हा जन्माच्या दाखल्यानंतरचा दुसऱ्या क्रमांकाचा हक्क ठरला. पालकांस परवडेल आणि बालकांच्या बौद्धिक क्षमतेस मानवेल असे शिक्षण त्याला क्रमाक्रमाने मिळाले पाहिजे, यासाठी सरकारी यंत्रणांनी काळजी घ्यावी, यासाठी शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आला, तरी बालकांच्या जन्मासोबत त्याचे बोट धरून आलेल्या समस्यांनी कायमची माघार घेतलेली नाही. वस्तुतः या समस्यांची जाणीव संबंधितांस नाही असे मुळीच नाही. उलट, या समस्यांवर तोडगा काढण्याकरिता ज्या काही उपाययोजना केल्या जातात, त्यावर कोट्यवधी रुपये खर्च होऊन एकामागून एक अहवाल सरकारी दप्तरांच्या ढिगाऱ्यांत जमादेखील होत असतात. प्रत्येक समस्येचा अभ्यास असलेले अनेक तज्ज्ञ सरकार दरबारी असतात आणि जेव्हा अशा काही समस्या उग्र होतात, तेव्हा हे तज्ज्ञ उपायांचे अहवाल नव्याने तयार करून सरकारी यंत्रणांना सादर करतात. बालकांशी संबंधित असलेल्या समस्यांवरील संशोधने, त्यावरील उपाययोजनांच्या शिफारशींचे असंख्य अहवाल सरकारी दप्तरांच्या बासनात वर्षानुवर्षे पडलेले आढळतात, तरीही त्या समस्या कायमच्या सोडविण्यात अंतिम यशाचा टप्पा गाठणे शक्य का होत नाही, हे एक कोडे अजूनही शिक्षण व्यवस्थेभोवती घिरट्या घालत आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांवरील उपायांच्या असंख्य शिफारशी सोबत असूनही त्या समस्यांचा विळखा सुटलेला नाही. उलट ग्रामीण आणि दुर्गम भागांतील बालकांच्या कुपोषणासारख्या समस्येने शहरी भागांतील काही वस्त्यांमध्येही ठाण मांडलेले दिसू लागले आहे. जन्माच्या दाखल्याचा हक्क प्राप्त होऊनही सुरक्षित जगण्याकरिता आणि भविष्य घडविण्याकरिता आवश्यक असलेल्या शिक्षणाचा हक्कदेखील बालकांस प्राप्त झाला, परंतु त्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा सहजपणे उपलब्ध होण्यातील अडथळे मात्र अजूनही दूर झालेले नाहीत. तसे नसते तर विद्यार्थ्यांच्या गळतीची समस्या अजूनही शिक्षण खात्याची डोकेदुखी ठरून राहिली नसती. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांस आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत मिळाले पाहिजे, पण महानगरांमधील महापालिकांच्या शाळांत केवळ सातवीपर्यंतचेच वर्ग असल्याची बाब पूर्वी एकदा मुंबईसारख्या महानगरात उघडकीस आली होती. सहाजिकच पुढच्या शिक्षणाकरिता आवश्यक असलेला खर्च न पेलवल्याने शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ विद्यार्थ्यांवर येते, ही बाब सरकारी अहवालांतून निसटलेली नाही. गेल्या अनेक अहवालांत शिक्षणाचा न पेलवणारा खर्च ही बाब नोंदविली गेली असेल, तरीही यावर तोडगा निघण्याची आणि हक्काचे शिक्षण मोफत देणाऱ्या शाळांमध्ये तशी सुविधा निर्माण करण्याची गरज अजूनही पूर्ततेच्या प्रतीक्षेत असल्याचेच दिसते. विद्यार्थ्यांच्या गळतीची जी काही अनेक कारणे वेळोवेळी निदर्शनास आणून दिली गेली आहेत, त्यापैकी आणखी एक कारण अजूनही अनेक शाळांत दुर्लक्षित राहिले आहे. ते म्हणजे, शाळांमध्ये सुरक्षित व आरोग्यपूर्ण स्वच्छतागृहांचा व सोयीसुविधांचा अभाव । या प्रश्नांवर पूर्वी न्यायालयांनीही सरकारी यंत्रणांस धारेवर धरल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत आणि अजूनही सरकारी यंत्रणा या त्रुटी दूर करण्याच्या विविध उपाययोजनांची भेंडोळी वेळोवेळी फडकावतच आहेत. या समस्यांमुळे ज्या भागांत गळतीचे प्रमाण अधिक आहे, त्याची पाहणी करून त्या त्रुटी तातडीने दूर करा, असा एक आदेश उच्च न्यायालयाने सुमारे आठ वर्षांपूर्वी मुंबई महापालिकेस दिला होता. न्यायालयांचे असे निर्देश सर्वसाधारणपणे संबंधित क्षेत्रांतील अन्य शाळांनीदेखील अमलात आणावेत अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. मात्र, अजूनही या त्रुटी आणि गैरसोयींना बाहेरचा रस्ता दाखविला गेलेला नाही, हे उघड होत आहे.ते कसे, हे पाहण्यासाठी राज्य सरकारने जारी केलेल्या एका ताज्या शासन निर्णयातील तपशील पडताळून पाहावा लागेल. शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार, प्रत्येक बालकाच्या निवासापासून एक किलोमीटर अंतराच्या आत प्राथमिक शाळा आणि तीन किलोमीटर अंतराच्या परिसरात उच्च माध्यमिक शाळा किंवा वाहतुकीची सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक आहे.*

# आदर्श आचारसंहितेचे पालन गरजेचे

लोकसभा निवडणूक २०२४ च्या आगामी महत्त्वपूर्ण फेरीच्या आगमनाने, भारताच्या निवडणूक आयोगाने, १६ मार्च २०२४रोजी नवीन आचार नियम जाहीर केले आहेत. या नवीन आचारसंहितेद्वारे निवडणूक प्रक्रियेत निष्पक्षता, नि:पक्षपातीपणा आणि समानता सुनिश्चित केली जाईल. हे नवीन नियम केवळ राजकीय पक्ष आणि नेत्यांसाठीच नाहीत, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठीही आहेत, जेणेकरून निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि न्याय सुनिश्चित करता येईल. पारदर्शक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याची जबाबदारी राजकीय पक्षांसह सामान्य नागरिकांवर देखील आहे.निवडणूक आयोग हा लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ आहे. त्यामुळे निवडणुका मुक्त आणि निष्पक्षपणे पार पडतील याची खात्री होते. आचारसंहितेच्या काळात निवडणुकीशी संबंधित सर्व बाबींमध्ये निवडणूक आयोग सर्वोच्च असतोआचारसंहिता लागू होताच निवडणूक आयोग सर्वात शक्तिशाली होतो.लोकसभा निवडणूक तारखा जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे देशभरात आचारसंहिता लागू झाली. निवडणूक संपेपर्यंत आचारसंहिता लागू राहणार आहे. या काळात निवडणुकीशी संबंधित सर्व बाबींमध्ये निवडणूक आयोगाला 'सर्वशक्तिमान' मानले जाते.आचारसंहिता ही एक मार्गदर्शक तत्व आहे जी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि सरकार यांना लागू होते. निवडणूक मुक्त आणि निष्पक्षपणे पार पाडणे हा आचारसंहितेचा उद्देश आहे. या अंतर्गत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना काही नियमांचे पालन करावे लागेल.आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल निवडणूक आयोग कोणत्याही उमेदवार किंवा पक्षावर दंडात्मक कारवाई करू शकतो. राजकीय पक्ष आणि उमेदवारांना निवडणूक लढवण्यापासून रोखू शकते. आचारसंहिता लागू होताच देशात काय बदल होतात, सरकारच्या कामकाजावर काय परिणाम होतो, सरकारकडे किती अधिकार उरले आहेत, हे जाणून घ्या या खास कथेत.

भाषण देताना बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल.निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, या काळात कोणताही पक्ष किंवा उमेदवार असे कोणतेही काम करणार नाही ज्यामुळे विविध जाती, समुदाय, धर्म, भाषा यांच्यात पूर्वीपासून असलेले मतभेद वाढतील. किंवा त्यांच्यात परस्पर द्वेष निर्माण होऊ शकतो किंवा तणावाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. मशिदी, चर्च, मंदिरे किंवा इतर प्रार्थनास्थळे निवडणूक प्रचारासाठी व्यासपीठ म्हणून वापरता येणार नाहीत.इतर पक्षांवर टीका करताना केवळ त्यांची धोरणे, कार्यक्रम, मागील काम, नोंदी यावर चर्चा केली जाईल. वैयक्तिक जीवनातील ज्या पैलूंचा राजकीय घडामोडीशी काहीही संबंध नाही अशा गोष्टींवर टीका करणे टाळावे. पुराव्याशिवाय केलेले आरोप किंवा विपर्यास विधानांच्या आधारे इतर पक्षांवर किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांवर टीका करता येत नाही.मतदारांना लाच देणे, मतदारांना धमकावणे, मतदारांची बनावट ओळख निर्माण करणे आणि मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रचार करणे हे गुन्हे आहेत. याशिवाय मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करणेही चुकीचे आहे.

राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी त्यांच्या समर्थकांनी इतर पक्षांच्या सभा आणि रॅलींमध्ये व्यत्यय आणणार नाही याची काळजी घ्यावी. कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी किंवा समर्थकांनी इतर कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभांमध्ये लेखी किंवा तोंडी प्रश्न विचारून किंवा त्यांच्या पक्षाची पत्रिका वाटून गोंधळ घालू नये.ज्या ठिकाणी दुसऱ्या पक्षाची सभा आधीच आयोजित केली जात आहे अशा ठिकाणाहून राजकीय पक्ष रॅली काढू शकत नाहीत. याशिवाय एका पक्षाने लावलेले पोस्टर दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते काढू शकत नाहीत. घरासमोर आंदोलन करता येत नाही प्रत्येकाला आपल्या घरात शांततेने राहण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला हा अधिकार मिळतो. एखाद्याला राजकीय पक्ष किंवा उमेदवारांची राजकीय मते किंवा कार्य आवडत नसले तरीही.

एखाद्या व्यक्तीच्या कल्पना किंवा क्रियाकलापांना विरोध करण्यासाठी त्यांच्या घराबाहेर प्रदर्शन किंवा घोषणाबाजी करू शकत नाही. विरोध करण्याचे इतर मार्ग आहेत, घराबाहेर जमणे योग्य नाही.कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार त्याच्या समर्थकांना परवानगीशिवाय झेंडे लावू शकत नाही, बॅनर लावू शकत नाही, नोटीस पेस्ट करू शकत नाही किंवा कोणत्याही व्यक्तीच्या घराच्या भिंतीवर, जमिनीवर किंवा परिसरात घोषणा लिहू शकत नाही.जाहीर सभा किंवा रॅलीची माहिती आधी पोलिसांना द्यावी लागेल.राजकीय पक्षांनी त्यांच्या जाहीर सभा किंवा प्रचाराच्या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती स्थानिक पोलिसांना देणे आवश्यक आहे. यामध्ये संमेलनाचे ठिकाण आणि वेळ समाविष्ट आहे. यामुळे पोलिसांना वाहतूक व्यवस्थापित करण्यास आणि शांतता राखण्यासाठी बंदोबस्त करण्यास मदत होईल.तसेच, कोणतीही बैठक घेण्यापूर्वी, पक्षांनी त्या भागात कोणतेही निर्बंध किंवा मनाई आदेश आहे की नाही हे शोधले पाहिजे. असे कोणतेही बंधन असेल तर



त्याचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. त्या निर्बंधात शिथिलता हवी असेल तर आधी अर्ज करून परवानगी घ्यावी लागेल.

सार्वजनिक सभेसाठी लाऊडस्पीकर किंवा इतर कोणत्याही गोष्टीची परवानगी घेणे बंधनकारक असल्यास, पक्ष किंवा उमेदवाराने संबंधित प्राधिकरणाकडे अगोदरच अर्ज करावा लागेल. सार्वजनिक सभेत कोणीही त्रासदायक किंवा अशांतता निर्माण करणाऱ्या व्यक्तीला सामोरे जाण्यासाठी आम्ही तेथे तैनात असलेल्या पोलिसांची मदत घेऊ. आयोजक स्वतः अशा लोकांवर कोणतीही कारवाई करू शकत नाहीत.

मिरवणूक काढताना हे नियम पाळणे गरजेचे आहे.मिरवणूक काढणाऱ्या पक्षाला किंवा उमेदवाराला मिरवणूक कुठे आणि किती वाजता निघायची हे आधीच ठरवावे लागेल. ते कोणत्या मार्गाने जाईल? कुठे आणि कधी संपेल? विनाकारण मिरवणुकीच्या मार्गात किंवा वेळेत कोणताही बदल करता येणार नाही. वाहतुकीचे नियम पाळावे लागतात.मिरवणूक नेहमी रस्त्याच्या उजव्या बाजूने गेली पाहिजे आणि मिरवणुकीदरम्यान तेथे तैनात असलेले पोलिस जे सांगतील ते पाळणे बंधनकारक आहे. दोन किंवा अधिक पक्षांना किंवा उमेदवारांना एकाच मार्गावर किंवा त्याच्या काही भागांवर अंदाजे एकाच वेळी मिरवणूक काढायची असल्यास, दोन्ही पक्षांनी/उमेदवारांनी आधीच एकमेकांशी सल्लामसलत करावी.

सरकारी तिजोरीतून जाहिराती दाखवता येणार नाहीत.आचारसंहितेच्या काळात सरकारी तिजोरीतून वृत्तपत्रे आणि इतर माध्यम वाहिन्यांवर जाहिराती देणे आणि सरकारी माध्यमांचा गैरवापर पूर्णपणे टाळावा. निवडणुकीशी संबंधित बातम्या एकतर्फी दाखवण्यासाठी किंवा सत्ताधारी पक्षाच्या यशाची प्रसिद्धी करण्यासाठी सरकारी माध्यमांचा वापर केला जाऊ शकत नाही, ज्यामुळे सत्ताधारी पक्षाला निवडणुकीत फायदा होऊ शकतो. कोणतीही जाहिरात आधीच चालू असेल तर ती काढून टाकावी लागेल.

सरकारी पैसा वापरता येत नाही मंत्री आणि इतर अधिकारी सरकारी तिजोरीतून कोणत्याही योजनेसाठी पैसे देऊ शकत नाहीत किंवा कोणत्याही योजनेला मंजुरी देऊ शकत नाहीत. सरकारी कर्मचाऱ्यांशिवाय कोणताही मंत्री किंवा अधिकारी कोणत्याही नवीन प्रकल्पाची किंवा योजनेची पायाभरणी करू शकत नाही. तसेच सरकार कोणतीही कायमस्वरूपी किंवा तात्पुरती नियुक्ती करू शकत नाही.

अचानक कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती किंवा साथीचा रोग उद्भवला आणि सरकारला कोणतीही उपाययोजना करायची असेल, तर त्यासाठी आधी निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागेल.

सरकारी मालमत्तेवर उमेदवारांचा हक्क केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या पक्षाचे नेते निवडणूक प्रचारासाठी त्यांच्या अधिकृत पदाचा वापर करू शकत नाहीत. विशेषतः, मंत्री त्यांच्या अधिकृत भेटींना निवडणूक प्रचाराच्या कामात मिसळणार नाहीत आणि निवडणूक प्रचारादरम्यान सरकारी यंत्रणा किंवा कर्मचारी वापरणार नाहीत.निवडणूक प्रचारासाठी सभास्थळ आणि हेलिपॅड वापरण्याचा अधिकार केवळ सत्ताधारी पक्षाला असणार नाही. ज्या अटी व शर्तीवर सत्ताधारी पक्ष वापरतो त्याच अटींवर इतर पक्ष आणि उमेदवारांनाही या सुविधा वापरण्याची मुभा असेल.शासकीय विश्रामगृह, डाक बंगला किंवा इतर शासकीय निवासस्थान हे सत्तेतील राजकीय पक्ष किंवा त्यांच्या उमेदवारांच्या एकट्याच्या अधिपत्याखाली राहणार नाही. इतर पक्ष आणि उमेदवारांनाही या जागेचा वापर करण्याचा समान अधिकार असेल. पण लक्षात ठेवा, कोणताही पक्ष किंवा उमेदवार निवडणूक प्रचारासाठी या सरकारी निवासस्थानांमध्ये (आणि आजूबाजूच्या परिसरात) जाहीर सभा घेऊ शकत नाही.

**मंत्र्यांवर निर्बंध :**केंद्र सरकार किंवा राज्य सरकारचे मंत्री कोणत्याही मतदान केंद्रावर किंवा मतमोजणीच्या ठिकाणी जाऊ शकत नाहीत. केवळ उमेदवार, मतदार किंवा उमेदवाराचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून ते या ठिकाणांना भेट देऊ शकतात.

**-प्रा डॉ सुधीर अग्रवाल**
**वर्धा**, ९५६१५९४३०६

# विजया कडू यांना साहित्य पुरस्कार जाहीर



पथ्रोट : स्व. सूर्यकांतादेवी पोटे चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार वितरण सोहळा उद्या गुरुवारी स्वामी विवेकानंद सभागृह, पी. आर. पोटे अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरात संपन्न होत आहे.श्री रामचंद्र पोटे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्याला माजीमंत्री प्रवीण पोटे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ.

सुखदेव ढाणकेसह महाराष्ट्रातील सात साहित्यिकांना विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये साहित्य क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या १७ साहित्यिकांचासुध्दा सत्कार करण्यात येणार आहे. त्यात विजया सुरेंद्र कडू, पथ्रोट त्यांच्या 'आरसा' या काव्य संग्रहाकरिता सन्मानित करण्यात येणार आहे. या यशाबद्दल विजया मारोतकर, वासंती मंगरोळे, अमेद्र वर्मा, नारायण इंगळे, आनंद चिठोरे, मनीष हावरे, गोफणकार, डॉ. रमेश गोटखडे, प्रमोद निर्मळ, प्रशांत गोरले, सोपान हरणे, रवी शुक्ला यांनी त्यांचे स्वागत केले

# जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम कक्षाची स्थापना

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली निवडणूकविषयक विविध कक्षांची पाहणी



अमरावती : लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये निवडणूकविषयक विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी निवडणूक कामजाबाबत स्थापन करण्यात आलेल्या कक्षांना भेट देऊन पाहणी केली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनातील पहिल्या माळ्यावर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत माध्यम सनियंत्रण व प्रमाणिकरण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी भेट देऊन येथील व्यवस्था व सुविधेची पाहणी केली. या कक्षाच्या लगतच खर्च सनियंत्रण पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच या इमारतीतील वाहन व्यवस्था कक्ष, महसूल भवन जवळील आदर्श आचार संहिता विभाग, ग्रामपंचायत विभागाजवळील एक खिडकी कक्ष यांनाही जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन पाहणी केली.

स्थापन करण्यात आलेल्या विविध कक्षांमार्फत निवडणूकविषयक कामकाज विहित कालावधीत जबाबदारी व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याची सूचना कटियार यांनी यावेळी केली. संबंधित सर्व नोडल अधिकाऱ्यांशी त्यांनी यावेळी संवाद साधला. आदर्श आचारसंहितेचे नोडल अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसीलदार निलेश खटके, खर्च सनियंत्रण पथकाचे नोडल अधिकारी चंद्रशेखर खंडारे, माध्यम सनियंत्रण व प्रमाणिकरण कक्षाच्या नोडल अधिकारी अपर्णा यावलकर, सहायक माहिती अधिकारी सतीश बगमारे, खर्च सनियंत्रण पथकाचे सहायक नोडल अधिकारी विजय देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

## अंजनगाव सुर्जी तालुक्यात अवैध व्यवसायाला उधाण

अंजनगाव सुर्जी : गेल्या सात-आठ वर्षांपासून अंजनगाव सुर्जी तालुक्यामध्ये बंद असलेल्या वरली मटका व्यवसायाला तसेच अवैध दारू विक्रीला चाप बसला असताना गेल्या काही दिवसापासून तालुक्यामध्ये या अवैध व्यवसायाने तोंड वर काढले आहे. परंतु याकडे पोलिस विभागाचे दुर्लक्ष असल्याची ओरड होत आहे संपूर्ण तालुक्यात गेल्या आठ- दहा वर्षांपासून वरली मटका, अवैध दारू विक्री यावर काही प्रमाणात पोलीस प्रशासनाने वचक निर्माण केला होता, परंतु गेल्या काही महिन्यापासून या अवैध व्यवसायाने एकदमच पुन्हा डोके वर काढल्याने संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे. या अवैध धंद्याच्या नादी लागून कित्येक तरुण चावडी चौकात दिवसभर आकडेमोडीत मग्न असतात. या अवैध धंद्यांनी कित्येक कुटुंब उद्धस्त केले आहेत, तालुक्यातील अंजनगाव सुर्जी शहरासह मोठमोठ्या गावांमध्ये खुलेआम वरली मटकाचा व्यवसाय सुरू झाल्याने अनेक तरुण दिवसभर या व्यवसायात गुंतलेले असल्याचे चित्र दिसुन येत आहे. यातून मोठा गुन्हा घडण्याची भीती निर्माण झाली आहे. यातून टोळीयुध्दाचीदेखील शक्यता वर्तवल्या जात आसताना, या अवैद्य धंद्यावर पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन या व्यवसायावर अंकुश ठेवावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## बहुजन नायक कांशीराम यांची ९० वी जयंती साजरी



अमरावती : बहुजन नायक काशीराम यांच्या ९० वा जयंती उत्सव आनंद सेलिब्रेशन हॉल, स्वयंप्रभा कॉलनी,कठोरा रोड येथे संत शिरोमणी रोहिदास महाराज बहुउद्देशीय संस्था व गुरु रविदास सत्यशोधक समाज समिती यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. सर्वप्रथम काशीराम यांच्या फोटोचे पूजन व हारार्पण तसेच अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांची तिसऱ्यांदा अमरावती जिल्हाध्यक्षपदी नेमणूक झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पि.बी.वनसकर तर प्रमुख अतीथी व प्रमखु वक्ते म्हणनू धारणी यथे ील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय गवई तसेच प्रमुख वक्ते म्हणून गजानन इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांडुरंग धुमाळे तर संचालन राजेंद्र ढाकरे यांनी तसेच आभार रुपराव इंगळे यांनी मानले. कार्यक्रमाला दयाराम तायडे, प्रकाश शेलापुरकर, उमेश ऊदापुरे, डॉ.प्रा.नंदकिशोर खंडारे, विजय शेकोकार, राजेंद्र ठाकरे, उत्तमराव तायडे, उत्तमराव इसळकर, सुखदेवराव नाथे, योगेश पखाले, अरुण सेगेकर, विनोद वाजगे, प्रा.डॉ.गजानन चंदनकर, सुरेश चिमनकर, मनोहर इंगळे, गुलाबराव मालखेडे, आशिष तायडे, गजानन इंगळे, हरिदास ठाणेकर, रमेश डामरे, कोकिळा तायडे, मंगला गवई, संध्याताई ईसाळकर, नेहा तायडे, देऊळकर आदिसह समाज बांधव उपस्थित होते.

## आचारसंहितेमुळे अडकलीत जिल्हा परिषदेची ४०.८६ कोटींची कामे

अमरावती : लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी लागू झालेल्या आचारसंहितेच्या कालावधीत कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) बाकी असलेली विकास कामे सुरू करता येणार नाहीत. या पोर्शभूमीवर जिल्हा परिषदेतील ४० कोटी ८६ लाख रुपयांची कामे अडकून पडली आहेत. आता निवडणुकीनंतरच या कामांना कार्यारंभ दिला जाणार आहे. आचारसंहिता लागू होण्यापुर्वी सुमारे ८१ कोटी ८० लाख ७ हजार रुपये किमतीच्या ६०३ कामांना कार्यारंभ आदेश दिल्याने ही कामे आचारसंहितेच्या कालावधीत सुरू करता येऊ शकतील.

जिल्हा परिषदेच्या सन २०२३-२४ या वर्षाकरिता बांधकाम विभागाला सर्वसाधारणमध्ये ८९ कोटी ५० लाख १७ हजार रुपयांची ६७३ कामे मंजूर करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षाची अखेर होत असताना बांधकाम विभागाने निवडणूक आचारसंहितेपूर्वी ६२ कोटी ८५ लाख ५ हजार रुपयांची ५४० कामांना कार्यारंभ आदेश दिला, परंतु, यामधून २६ कोटी ६५ लाख १२ हजार रुपयांची १३३ कामे मात्र निवडणुकीच्या आचारसंहितेमध्ये अडकली आहेत.

## चवदार तळ्याचे आंदोलन, व्यवस्था मुक्तीचा प्रारंभ-रणजित मेश्राम



अमरावती : महाड तळ्याचे आंदोलन ही केवळ घटना वा कृती नसून बाबासाहेबांनी केलेल्या व्यवस्था मुक्तीचा प्रारंभ असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार व आंबेडकरी भाष्यकार प्रा. रणजित मेश्राम यांनी व्यक्त केले. आंबेडकर विचारधारा अध्यासन व विचारधारा विभाग आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महाडच्या चवदार तळ्याचे आंदोलन : आजची प्रासंगिकता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यासन व विभाग प्रमुख डॉ अविनाश फुलझेले हे अध्यक्षस्थानी होते. रणजित मेश्राम म्हणाले, अस्पृश्य हा हिंदुतील सर्वात खालचा तरीही अविभाज्य घटक आहे. यापलीकडे ओळख नव्हती. दयेच्या नावावर अस्पृश्योध्दाराची वेगवेगळी कर्मे सूरु होती. अशा अंधकार काळात अस्पृश्यांची स्वतंत्र ओळख व स्वत:चे उन्नयन करण्याच्या विशसाचे रोपण या चवदार कृतीने केले. पुढे जो मुक्तीप्रवास घडला त्याची बांधणी या कृतीशी असल्याचेही ते म्हणाले. अनेकानेक दाखले देत रणजित मेश्राम यांनी आज ९७ वर्षानंतर या मुक्तीप्रवास व प्रयासाचे अवलोकन होण्याची गरज असल्याचे म्हटले. आपण कालमध्ये रमावे की आज आणि उद्यात जगावे याकडेही त्यांनी लक्ष वेधले. जे जे संभाव्य धोके बाबासाहेबांनी वेगवेगळ्या प्रसंगातून सांगितले, त्यांचे स्मरण व मापन यांची नितांत गरज असल्याचेही प्रा. मेश्राम यांनी सांगितले. देशाचे संविधान नजरकैदेत असल्याची सदृश्यस्थिती असल्याचे सांगून ते म्हणाले, तंत्र- यंत्र युगाकडून पुन्हा मंत्र युगाकडे हा देश ढकलण्याकडे जात असल्याची चिंता रणजित मेश्राम यांनी व्यक्त केली. अध्यक्षस्थानी असलेले विभागप्रमुख डॉ अविनाश फुलझेले यांनी समयोचित असे अध्यक्षीय भाषण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागातील विद्यार्थी मिथुन दुपारे यांनी तर आभार भीमराव फुसे यांनी मानले. या व्याख्यानाला विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होत

## कुख्यात गुन्हेगाराविरुद्ध 'एमपीडीए' कायद्यान्वये कारवाई



अमरावती : बेलपुरा येथील कुख्यात गुन्हेगार प्रशांत उर्फ सोनू लक्ष्मण चावरे (२६) याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार त्याला एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. ही कारवाई १९ मार्च रोजी करण्यात आली.

प्रशांत चावरे हा सन २०१८ पासून गुन्हेगारी कारवाईमध्ये लिप्त आहे. त्याच्याविरुद्ध राजापेठ व बडनेरा पोलीस ठाण्यात संगनमताने दुखापत करणे, गंभीर दुखापत करण्याच्या उद्देशाने हल्ला, अश्लीलशिवीगाळ करून मारण्याची धमकी, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तणूक, दंगा करणे, अश्लील शिवीगाळ, आरोपीस आश्रय देणे, विनयभंग, खून, खुनाचा प्रयत्न, हद्दपार आदेशाचे उल्लंघन, जबरी चोरी, कट रचून जिवे मारण्याचा उद्देशाने अपहरण करून हत्या व पुरावा नाहीसा करणे, असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तडीपारीची कारवाई करूनदेखील तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय असल्याने त्याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात यावी, असा प्रस्ताव राजापेठ ठाण्याकडून पाठविण्यात आला होता. स्थानबद्धतेच्या प्रस्तावाची साहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी पूर्तता केली. या प्रस्तावावर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी १९ मार्च रोजी आदेश पारित केला. त्यानुसार प्रशांत चावरे याला गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या पथकाने ताब्यात घेऊन राजापेठ पोलीस ठाण्यात हजर केले. तेथून त्याला स्थानबद्धतेच्या कालावधीकरिता मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.

## सारा अली खानने ट्रोलिंगवर केलं भाष्य



*'केदारनाथ' चित्रपटातून सैफ अली खानची लाडकी लेक सारा अली खानने मनोरंजनविश्वात पहिलं पाऊल ठेवलं. आजच्या घडीला तिला बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखलं जातं. अभिनय क्षेत्राव्यतिरिक्त सारा तिच्या सोशल मीडियाद्वारे सुद्धा प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. अभिनेत्रीचा साधाभोळा अंदाज तिच्या चाहत्यांना कायम भावतो. परंतु, अनेकदा तिला ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत साराने याबाबत भाष्य केलं आहे.सोशल मीडियावर वारंवार ट्रोलिंग व टीका होत असल्याने अनेकदा मानसिक त्रास होत असल्याचं साराने दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. अभिनेत्री म्हणाली, माझ्या कामाबाबत जर कोणी टिप्पणी केली, तर निश्चितच मला फरक पडतो. याउलट लोक माझ्या व्यक्तिमत्त्वाविषयी कमेंट्स करत असतील, तर मी दुर्लक्ष करते. मला फरक पडत नाही. मी खूप जास्त हसत-खेळत सर्वांचं मनोरंजन करायला जाते आणि याच गोष्टी अनेकजण नकारात्मकतेने घेतात. सारा पुढे म्हणाली, माझ्या स्वभावामुळे काहीजण मला मूर्ख आणि चुकीचं समजतात. त्यांना वाटतं मी आयुष्यात काहीच करू शकत नाही. पण, माझा स्वभाव असाच आहे मी कधीच खोटं वागत नाही. माझ्या जवळचे मित्र-मैत्रिणी, कुटुंबीय मला खूप चांगलं ओळखतात ते गंभीर आणि विनोदी अशा माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या दोन्ही बाजू समजून घेतात. अर्थात सगळेजण असा विचार करू शकत नाही. काही लोक कधी-कधी 'ही जोकर आहे, गंभीर कामं कशी करू शकते' ( ये तो जोकर है) असा समज करून घेतात. सोशल मीडियावर होणाऱ्या ट्रोलिंगबद्दल सारा सांगते, मी अभिनय क्षेत्रात काय काम करते, अभिनेत्री म्हणून मी कशी आहे? याशिवाय नृत्यांगना म्हणून किंवा एखाद्या पुरस्कार समारंभात मी चांगलं परफॉर्म करत नसेन, लोकांना ते आवडलं नाही तर मला जरुर वाईट वाटेल मी माझ्यात सुधारणा करेन.*

## येत्या पाच वर्षांत जगाची धुरा भारताकडे : नरेंद्र मोदी



नवी दिल्ली : येत्या पाच वर्षात जगाची धुरा भारताकडे असणार आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.एका खासगी वृत्तवाहिनीच्या सोहळ्यात मोदी बोलत होते. यावेळी बोलताना मोदी म्हणाले की, गेल्या पाच वर्षात भारतीय अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर पोहोचली. विरोधी पक्षांना काय वाटते, यापेक्षा जनतेला काय वाटते, हे महत्त्वाचे आहे.भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने केलेल्या आर्थिक उपाययोजनांमुळेच जगभरात भारताचा डंका पिटला जात आहे. झेपावणार्या अर्थव्यवस्थेमुळे लवकरच भारत जगातील तिसर्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनणार आहे. किंबहुना, पाच वर्षांत जगाची धुराच भारताकडे येणार आहे. आगामी पाच वर्षांत भारताचा अभूतपूर्व विकास होणार असल्याची हमी मी आपणास देतो. मोदीची गॅरंटी म्हटल्यावर विकास १०० टक्के होणार आहे. दहा वर्षांपूर्वीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात केवळ बजबजपुरी होती. घोटाळा आणि भ्रष्टाचाराने बरबटलेल्या 'संपुआ' सरकारमुळे विकासाला खीळ बसली होती.

# अमरावतीची जागा भाजपच लढणार!- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




अकोला : भाजपने उमेदवार जाहीर केलेल्या सर्वच मतदारसंघातील तयारीचा परिपूर्ण आढावा घेऊन उमेदवारांच्या अडचणी समजून त्या दूर करण्यावार भर दिला जात आहे. राज्यातील सर्वच मतदारसंघात एकदा निर्णय झाल्यानंतर महायुतीचा उमेदवार म्हणून सर्वांना काम करावे लागेल. काही नाराजी असेल तर ती आम्ही चर्चा करून दूर करीत आहोत. महायुती म्हणून सर्व घटक पक्ष कार्यरत राहतील, असा विश्वास भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. अमरावतीची जागा भाजपच लढणार असून जो उमेदवार असेल तो कमळावर लढणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अकोला लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'भाजपच्यावतीने जाहीर झालेल्या उमेदवारांच्या मतदारसंघात एकूण निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व मी दौरा करीत आहे. सर्वच मतदारसंघामध्ये आम्ही जाणार आहोत. आता लगेच जाहीर प्रचार सुरू होत नाही. तो सुरू होण्यापूर्वी एकदा नीट व्यवस्था लावून नियोजन केले जात आहे. काही अडचणी असतील तर त्या समजून दूर केल्या जातील. अकोल्यात चांगली तयारी असून बुथपर्यंत सगळी रचना लावली आहे. पक्षाने ही निवडणूक बुथमध्ये लढली पाहिजे, असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार चांगला निर्णय येईल.'

अमरावतीची जागा भाजप लढेल. जो उमेदवार असेल तो पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढणार आहे. नवनीत राणा विद्यमान खासदार आहेत. त्या पूर्ण पाच वर्ष भाजपसोबत राहिल्या आहेत. लोकसभेत त्यांनी नरेंद्र मोदी आणि भाजपची बाजू मांडली. मात्र, अंतिम निर्णय पक्षाची संसदीय मंडळ व निवडणूक समिती घेईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. हर्षवर्धन पाटील यांचे काही प्रश्न होते. ते प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले असून काही सोडवले देखील आहेत. ते भाजपमध्ये आल्यापासून पक्षाप्रति समर्पित भावनेने कार्यरत आहे. पूर्णक्षमतेने ते पक्षाचे काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'माझी तर काही प्रतिमा ठेवा'**

खा. संजय राउत यांनी एका सभेत नरेंद्र मोदी यांची तुलना औरंगजेबाशी केल्याच्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीसांनी टीका केली. 'संजय राउत कोण आहे? संजय राउत सारख्या माणसाबद्दल मला विचारता, माझी तर काही प्रतिमा ठेवा', अशा शब्दात त्यांनी टोला लगावला.

# सासू, सासऱ्यांचा मानसिक शांततेसाठी सुनेला घराबाहेर काढता येणार नाही : उच्च न्यायालय

मुंबई : वयस्कर सासू, सासऱ्यांच्या मानसिक शांततेसाठी सुनेला सासरच्या घरातून बाहेर काढता येणार नाही, असा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. ज्येष्ठ नागरिकांना शांतपणे त्यांच्या घरात राहण्याचा अधिकार आहे, पण त्यांच्या रक्षणासाठीच्या कायद्यांचा वापर करताना घरगुती हिंसाचार विरोधी कायद्यातील तरतुदींची पायमल्ली होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.



न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी हा निकाल दिला आहे. वरिष्ठ नागरिक कायद्यातील तरतुदींचा वापर घरगुती हिंसाचार कायदा कलम १७च्या तरतुदींच्या विरोधात होऊ नये, असे ते म्हणाले. Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act मधील तरतुदींनुसार एका एका न्यायधीकरणाने हा निकाल दिला होता. ही बातमी बार अँड बेंचने दिली आहे.

या प्रकरणातील जोडप्यांचे लग्न २७ वर्षांपूर्वी झाले होते. या जोडप्यात सातत्याने भांडणे होत होती. हे घर सासऱ्यांच्या मालकीचे होते. न्यायधीकरणाने या जोडप्याला घर खाली करण्याचा आदेश दिला. पण नवऱ्याने मात्र हे घर सोडले नाही. त्यामुळे सुनेला घरातून बाहेर काढण्यासाठी केलेली ही खेळी होती, असे न्यायालयाने म्हटले आहे.

### शक्ती, ईव्हीएमवरून भाजपाची राहुल गांधींविरोधात आयोगाकडे तक्रार

नवी दिल्ली: काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी 'शक्तीविरोधात लढा' देण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. आयोगाने राहुल गांधींविरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश द्यावे, अशी मागणी भाजपकडून करण्यातआली आहे. भाजप नेते हरदीपसिंग पुरी यांनी आयोगाला पाठवलेल्या पत्रात राहुल गांधींनी मुंबईतील सभेतील भाषणाचा उल्लेख केला आहे. तसेच आयोग व ईव्हीएमवर टीका करून काँग्रेस नेते जनतेत संभ्रम निर्माण करीत आहेत, असे भाजपने म्हटले आहे.

# धारणीत गॅस सिलेंडरचा स्फोट; घर जळून खाक

अमरावती : मेळघाटातील धारणी शहरातील शिक्षक बँकेजवळ एका घरामध्ये वाणिज्यिक वापराच्या सिलेंडरचा स्फोट होऊन भीषण आग लागल्याने त्यांचे संपूर्ण घर जळून खाक झाले. शेजारच्या एका घराचेसुद्धा अल्प प्रमाणात नुकसान झाले. ही घटना बुधवारी सकाळी घडली. धारणी येथील सिव्हिल लाईन परिसरात राहणारे अशोक श्रीराम सोनी यांचा सराफा व्यवसाय आहे. सकाळी ९ वाजता त्यांच्या घरात असलेल्या वाणिज्यिक वापराच्या गॅस सिलेंडरचा अचानक भडका उडाला.



सिलेंडरच्या स्फोटानंतर काही क्षणात सोनी यांचे संपूर्ण घर जळून खाक झाले. यामध्ये जवळपास दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. त्याचप्रमाणे बाजूला राहणाऱ्या श्रीकृष्ण श्रावण खंडारे यांच्या घरालासुद्धा या आगीच्या झळा लागल्याने साहित्य जळून सुमारे एक लाखांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच मेळघाट क्षेत्राचे आमदार राजकुमार पटेल यांनी घटनास्थळी धाव घेऊन नगरपंचायतच्या अग्निशमन दलाला पाचारण केले. जवळपास दोन तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर शहरात बसस्थानकासमोरील बिसनसिंह गुमानसिंह राजपुरोहित यांच्या श्री बालाजी बिकानेर मिठाईवाला या दुकानाला आग लागली. ही घटना कळताच गावकरी मदतीसाठी धावून गेले. पोलिसांना ही माहिती कळताच ठाणेदार सुनील सोळंके, गणेश खंडारे व पोलिस ताफा घटनास्थळी पोहोचला. नांदगाव नगरपंचायत अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी दाखल झाले. मदतीला धावून आलेल्या गावकऱ्यांच्या सहकार्याने आग ताबडतोब आटोक्यात आणल्याने या आगेची झळ आजूबाजूला पोहोचली नाही व अनर्थ टळला. आगीचे कारण कळू शकले नाही.

# नेहरू युवा केंद्राच्या वतीने नारीशक्ती फिटनेस रन उपक्रम

अमरावती : नेहरू युवा केंद्राच्या वतीने जिल्हातील प्रत्येक तालुक्यामध्ये नारीशक्ती फिटनेस रन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांनी आपल्या फिटनेसची काळजी घेत दररोज कमीतकमी अर्धा तास स्वतःच्या स्वास्थ्यासाठी काढावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर - यांनी सांगितले.

नारीशक्ती फिटनेस रन हा उपक्रम अमरावतीमधील सावंगा आसरा, मोर्शीमधील तालुका क्रीडा संकुल, नांदगाव खंडेश्वरमधील एकलव्य ॲकॅडमी, धारणीमधील केकदाबोड, चांदूरबाजारमधील ब्राह्मणवाडा थडी,तिवसामधील भारवाडी, दर्यापूरमधील येवदा, अचलपूरमधील पथ्रोट,अंजनगाव सुर्जीमधील चिंचोली बु., भातकुलीमधील वासेवाडी, चांदूर रेल्वेमधील कळमगाव, चिखलदरामधील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धामणगाव रेल्वेमधील आदर्श महाविद्यालय व वरूडमधील पुसला येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदान जनजागृतीही करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश वाघमारे, सुमित घोगरे, मोनिका इसाने, अंकुश मानकर, विलास नागोसे, मनीषा दुडांदे, दीपक काळे, नीरज मावस्कर, अनिल जावळे, भूपेंद्र जेवडे, कांचन गवई, सूरज धर्मे, दिलीप पढाळ यांनी परिश्रम घेतले.

# लाच स्वीकारणारा कोतवाल 'एसीबी'च्या जाळ्यात

## अमरावती तहसील कार्यालयात कारवाई

अमरावती : शेतीच्या सातबारावर नाव दुरुस्ती करण्यासाठी एक हजाराची लाच स्वीकारणाऱ्या कोतवालाला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. ही कारवाई बुधवार, २० मार्च रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास अमरावती तहसील कार्यालयात करण्यात आली.

सचिन विजयराव मरकाम (४०) रा. जेवडनगर असे लाचखोर कोतवालाचे नाव आहे. या प्रकरणातील तक्रारकर्ते यांच्या वडिलांची मौजे मोरंगणा येथे वडिलोपार्जित शेती आहे. या शेतीच्या सातबाऱ्यावर तक्रारकर्ते यांचे काका व आत्या यांची भोगवटदार म्हणून नावे आहेत. परंतु, सातबारामध्ये त्यांच्या वडिलांच्या नावामध्ये चूक होती. त्यामुळे नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी तक्रारकर्ते यांनी तहसील कार्यालयामध्ये रितसर अर्ज केला होता.

१५ मार्च रोजी तक्रारकर्ते यांनी तहसील कार्यालयात जावून सदर अर्जाबाबत चौकशी केली. त्यावेळी कोतवाल सचिन मरकाम यांनी त्यांना तुमचे काम लवकर करून देतो, असे म्हणून ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तसेच त्यांना मौजे मोरंगणाच्या तलाठी यांचा अहवाल आणण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारकर्त्यांनी १८ मार्च रोजी सचिन मरकाम यांना तलाठी यांचा अहवाल दिला. त्यावेळी तक्रारकर्त्याने यासंदर्भात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात आली. पडताळणीत सचिन मरकाम यांनी तडजोडीअंती १ हजार रुपयाच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार बुधवारी सापळा रचण्यात आला. तक्रारकर्त्याकडून लाचेची १ हजाराची रक्कम स्वीकारताच कोतवाल सचिन मरकाम यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. या प्रकरणी गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.







गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफिक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF- COLOUR)